महाराष्ट्र शासन
आरोग्य विभाग
जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>वयक्तिक<br>Email | ०२५१-२७०९४३२<br>०२५१-२७०८७३०<br>ulhasnagarcs@gmail.com | जा.क्र.मरुउ/भांडार/सि.सि.टि.व्हि कॅमेरे व संबधित यंत्रणा देखभाल दुरुस्ती/ दर निश्चिती दरपत्रक/ 8316-17 /२६<br>दिनांक 19 /५/२०२६ |


# जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सन-२०२६-२०२७ या कालावधीमध्ये रुग्णालयातील सर्व विभाग,वॉर्ड,कार्यालये तसेच रुग्णालय परिसर यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव रुग्णालयामध्ये बसविण्यात आलेल्या सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या वाषीक देखभाल दुरुस्तीसाठी व देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये सदर यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी किंवा वाढीव कामांसाठी लागणा-या साहित्यांचे सोबत जोडलेल्या यादीनुसार दरनिश्चितीसाठी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केलले आहे. तरी इच्छुक सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेचे देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी यांनी बंद लिफाफामध्ये खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत (खालील अ.क्र.१४ नुसार) जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी. स्थानीक पुरवठाधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

================================================

## दरपत्रके सादर करणा-या देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाफ्यात सादर करावीत.यावर सदर जाहिर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे त्याचे नाव असावे.

२) एका सि.सि.टि.व्हिं कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारक यांना बाबनिहाय फक्त ०१ दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.उदा.जर दोन सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी. सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी अधिकृत सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या सेवा धारक, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील.

३) दरपत्रकात सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी आवश्यक असलेल्या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे कंपनी, क्षमता व इतर बाबी नमुद करणे आवश्यक आहे.पुरवठादार,निर्माणकर्ते (Manufacturer)यांचे अधिकृत सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

५) संस्था/दुकान,साहित्य पुरवठा/विक्रि विषयक/सेवा पुरवठा विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडवा.

६) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण- जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

७) व्यापारी लिफाफ्यामध्ये यादीमधील कंपनी, क्षमता यानुसार प्रती बाबनिहाय दर GST करांसह नमुद करावेत.

Scanned with OKEN Scanner

८) विहीत कालावधीत सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी उपलब्ध न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

९) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे GST करांसह हमाली,पोहच,स्थापीत करणे खर्चासहीत असावे.सर्व साहित्य मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे पोहच करावी लागेल.तसेच पोहोच करतेवेळी त्याची गणना यादीनुसार करुन देणे बंधनकारक राहिल.

१०) मंजुर न्युनतम दरांवर देखभाल दुरुस्ती धारकास काम करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने सेवा घ्यावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडुन वसुल केली जाईल.सर्व वस्तुंचे दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावेत.

११) वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१२) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. सदरील देखभाल दुरुस्ती सेवा आय.एस.आय मार्क दर्जाची किंवा त्यासमान दर्जाची असावी.

१३) सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकास कोणत्याही शासकीय विभागाने सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१४) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासून सात दिवस दिनांक २९/५/२०२६ संध्या.५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५) दरपत्रके उघडण्याची तारीख ०१/ ६ /२०२६ संध्या ०५.३० वा. किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१६) कोणतेही लेखी किंवा तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा अंशतःखरेदी प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७) या रुग्णालयाकडुन मागणी केलेल्या बाबींचेच व्यापारी लिफाफात दर GST करांसह नमुद करावे.

१८) मान्य न्युनतम दर आदेश निर्गमित केल्यापासुन एक वर्ष (३६५ दिवस) कालावधीसाठी वैध राहतील.

15-05-26

(डॉ.मनोहर बनसोडे )
जिल्हा शल्यचिकीत्सक
मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

प्रत- या रुग्णालयाच्या नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्दीसाठी .

NHM-IT cell या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

Scanned with OKEN Scanner

# व्यापारी लिफाफा

रुग्णालयाकडील विविध विभाग,वार्ड,कार्यालय तसेच रुग्णालय परिसर यांच्या सुरक्षेच्या दृष्टिने बसविण्यात आलेले सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्ती व दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या बाबी व साहित्य निहाय यादी

| अ.क्र. | देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध बाबी | प्रती ( नग ) बाब वार्षीक दर | एकुण बाबींचा वार्षीक देखभाल दुरुस्ती दर |
|---|---|---|---|
| १ | ०३ डि.व्हि.आर | | |
| २ | ०३ एन.व्हि.आर | | |
| ३ | ९९ cctv कॅमेरे | | |

| अ.क्र. | सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या बाबी | प्रती नग/मिटर रक्कम दर |
|---|---|---|
| १ | DVR | |
| २ | NVR | |
| ३ | CAMERA HD | |
| ४ | CAMERA IP | |
| ५ | POWER SUPPLY | |
| ६ | NETWORK SWITCH | |
| ७ | BNC CONECTOR | |
| ८ | HARD DISK 04TB | |
| ९ | HARD DISK 08 TB | |
| १० | CABEL CAT-6 | |

स्वाक्षरी

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकाचे संपुर्ण नाव------------------------------------

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा करणा-या संस्थेचे नाव------------------------------

संस्थेचा संपुर्ण पत्ता ------------------------------------------------------------

Scanned with OKEN Scanner